राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्र.मुमाआ/नों.क्र.८८४/२०२१/अपिल क्र.४४१७/२०२६

श्री.संग्रामसिंह प्रभाकर महाडीक
१४०२, आर्या इमारत, कांबरा गॅलेक्सी,
स्टार-३ संस्था, ब्रम्हांड, घोडबंदर रस्ता,
ठाणे (प),-४००६०७.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक बांधकाम विभाग,
इ.मा.-३,४ था मजला,मंत्रालय, मादाम कामा रस्ता, मुंबई-४०००३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सार्वजनिक बांधकाम विभाग,
इ.मा.-३,४ था मजला,मंत्रालय, मादाम कामा रस्ता, मुंबई-४०००३२.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०६.२०२६

अपीलकर्ता	:	उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी	:	उपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
१३.१०.२०२०	१२.०४.२०२३	२९.११.२०२०	--

अपिलार्थींनी दाखल केलेल्या मूळ **जोडपत्र अ** नुसार सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी स्वतःची तसेच त्यांचे विभाग व उपविभाग यांच्या संकेतस्थळावर अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याबाबत आग्रही मागणी केली असून या संदर्भात पहिले **जोडपत्र अ** तसेच **प्रथम अपील अर्ज व द्वितीय अपील** अर्ज दाखल केलेला आहे. याप्रकरणी अपिलार्थींनी याआधीही कोकण खंडपीठ अपिल क्रमांक केआर-३६४१/२०१४ यात दिनांक १५.०७.२०१५ रोजी खंडपीठाने **खालीलप्रमाणे आदेश पारित केला होता:-**

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमाच्या **कलम ४ (१) (बी) (११)** मध्ये येते आणि त्यामुळे माहिती विस्तृत असली तरीसुध्दा देणे आवश्यक आहे. अपिलार्थीने सर्व उप विभागाची माहिती विभागीय स्तरावर मागितलेली आहे. त्यांनी प्रत्येक उप विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहिती मागविणारे अर्ज करणे आवश्यक आहे.

३. जन माहिती अधिकारी, सा.बां. उपविभाग, सावंतवाडी, मालवण आणि वेंगुर्ला यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७ (१) मधील तरतुदीच्या अनुषंगाने अपिलार्थीस २०० पृष्ठांपर्यंतची माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवावी व यासंदर्भात अपिलार्थीची पोहोच प्राप्त करुन त्याची प्रत आयोगाला सादर करावी. त्यापुढील माहितीची पृष्ठे जन माहिती अधिकारी यांनी विहित शुल्क आकारुन अपिलार्थीस पुरवावीत.

४. अपिलार्थी यांना माहिती न पुरविल्याबाबत जन माहिती अधिकारी श्रीमती अनामिका जाधव, श्री.अहिरराव व श्री.व्ही.व्ही.साळुंखे हे व्यक्तिशः जबाबदार असून त्यांनी माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत करावयाच्या कार्यवाहीस काहीच महत्व दिलेले दिसून येत नाही, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चे उल्लंघन केले असल्याने, त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येवू नये याबाबत सुनावणीसंदर्भातील आयोगाच्या दिनांक २९/०६/२०१५ रोजीच्या सुचनेमधील परिच्छेद क्र.७ च्या अनुषंगाने 'समक्ष दिलेला खुलासा समाधानकारक नसल्यामुळे, त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये प्रत्येकी रु.५००/- (अक्षरी रु. पाचशे फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे. सदर रक्कम त्यांच्या माहे ऑगस्ट, २०१५ च्या वेतनातून वसूल करुन लेखाशीर्ष रु. ००१ इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या (अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

५. सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक प्राधिकरण असल्याने सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभागात माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या **कलम १९ (८) (ए)** अन्वये निर्देश देण्यात येतात की, त्यांनी सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून **कलम ४ (१) (बी)** खालील माहिती विशेषतः **कलम ४ (१) (बी) (११)** अन्वये योजना आणि कामाबद्दलची सर्व माहिती प्रसिध्द करण्याबाबत आणि सदर माहिती दर तीन महिन्यांनी अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी तसेच, वेबसाईटवर असलेल्या mahapwd.com पोर्टलमधील सन २०१४-२०१५ पर्यंतची माहिती अद्ययावत करावी. सद्य:स्थितीत यामध्ये सन २००९-२०१० पर्यंतची माहिती दिसून येत आहे. त्याचबरोबर सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रत्येक उप विभागाकरीता स्वतंत्र वेब पोर्टल सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी. त्यामध्ये प्लॅन आणि नॉनप्लॅन बजेटची माहिती द्यावी व दर तीन महिन्यानी सदरची माहिती अद्ययावत करावी. या माहितीमध्ये पुढील बाबी दर्शवाव्यात :-

१. कामाचे नांव

२. कामाचा तपशील व योजनांचा तपशील
३. मंजूर केलेली रक्कम व तारीख व काम सुरु झालेल्याची तारीख
४. ठेकेदारावे नाव
५. झालेला खर्च
६. शिल्लक रक्कम
७. कामाचा टप्पा.
८. काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक

त्याच अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने **दिनांक २५.०८.२०१५ खालीलप्रमाणे पत्र जारी केले होते:-**

सर्व मुख्य अभियंता, स्वयजनिक बांधतान प्रादेशिक विभाग, मुंबई/पुणे/नागपुर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणंबायत

संदर्भ : राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ, नवी मुंबई यांनी अपील क्र.आर-३६४१/२०१४ वर दि.१५/०७/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत.

श्री.शैलेश गजानन भोगले यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र.आर-३६४१/२०१४ वर, राज्य माहिती आयुक्त नवी मुंबई यांनी, कोंकण खंडपीठ दि.१५/०७/२०१५ अन्वये दिलेल्या निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

विषयांकित प्रकरणी श्री.शैलेश गजानन भोगले, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग, अपिलकर्ता यांनी दि.२२/०४/२०१४ अन्वये जन माहिती अधिकारी उप विभागीय अधिकारी, सा.बां. उपविभाग, कुडाळ वेंगुर्ला, दोडामार्ग, मालवण यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली मागिवलेली माहिती न मिळाल्याने त्यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने, राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी सदर प्रकरण दि.१५/०७/२०१५ अन्वये आदेश पारीत केले. राज्य माहिती आयुक्त यांनी मदर प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये **कलम १९ (८) (ए)** अन्वये निर्देश दिलेत.

सर्व क्षेत्रीय अधिकान्यांकडून **कलम ४ (१) (बी) (११)** अन्वये योजना आणि कामाबद्दलची सर्व माहिती प्रसिद्ध करण्याबाबतआणि सदर माहिती तीन महिन्यांनी अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी, तसेच वेबसाईटवर असलेल्या mahapwd.com पोर्टलमधील सन २०१४-२०१५ पर्यंतची माहिती अद्ययावत करावी. प्रत्येक उप विभागाकरीता स्वतंत्र वेब पोर्टल सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी. त्यामध्ये प्लॅन आणि नॉनप्लॅन बजेटची माहिती द्यावी व दर तीन महिन्यांनी सदरची माहिती, अद्ययावत करावी. या माहितीमध्ये १. कामाचे नांव, २. कामाचा तपशील व योजनांचा तपशील, ३. मंजूर केलेली

रक्कम व तारीख व काम सुरु झालेल्याची तारीख, ४. ठेकेदाराचे नांव ५. झालेला खर्च ६. शिल्लक रक्कम, ७. कामाचा टप्पा, ८. काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक या बाबी दर्शवाव्यात.

३. राज्य माहिती आयुक्त यांनी सदर प्रकरणी आदेशात उपरोक्त प्रमाणे दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी व तसे शासनास अवगत करावे, अशी आपणांस विनंती आहे.

तसेच अपिलार्थी श्री.महाडिक यांच्या अपिल क्रमांक १६०/२२/०१ यात दिनांक ०८.०२.२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत तत्कालीन माननीय मुख्य माहिती आयुक्त श्री.सुमित मल्लिक यांनी आदेशाच्या दिनांकापासून पुढील ६० दिवसात **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** यातील **कलम ४** अन्वये संकेतस्थळावर ठेवण्यात आलेली माहिती ही अद्ययावत करण्याचे निर्देश दिले असून विभागाने स्वतःच या संदर्भात दिनांक २६.०६.२०२० व ०४.०३.२०२२ रोजी पत्र निर्गमित केले असून सर्व मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना संकेतस्थळ अद्ययावत करण्यासह सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च तसेच कामाचे नांव, कामाचा तपशील, मंजूर केलेली रक्कम, तारीख, काम सुरू झालेली तारीख, कंत्राटदार/ ठेकेदाराचे नांव, झालेला खर्च, शिल्लक रक्कम, कामाचा टप्पा, काम पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक या संदर्भातील माहिती ही स्वयंप्रेरणेने उघड करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

अपिलार्थींनी आयोगाकडे दाखल केलेल्या पत्रावर **खालीलप्रमाणे बाबी निर्देशास आणून दिलेल्या आहेत:-**

संदर्भ: १) मा.राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई आदेश क्रमांक मुमाआ नो.क्र.५४५७/१९/अ.क्र.१६०/२२/०१ दिनांक ०८/०२/२०२२.

२) सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई जा.क्र. माअअ २०१९/प्र.क्र.०९/संगणक कक्ष दिनांक ०२/०७/२०२०.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई जा.क्र. माअअ २०१९/प्र.क्र.०९/संगणक कक्ष दिनांक १६/०७/२०२०.

४) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई जा.क्र. माअअ २०१९/प्र.क्र.२०/संगणक कक्ष दिनांक ०४/०३/२०२२.

५) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई जा.क्र. माअअ-२०२३/प्र.क्र.१०/संगणक कक्ष दिनांक १२/४/२०२३.

६) शासन परीपत्रक क्रमांक संकीर्ण २०१४/प्र.क्र. (२४०/१४) सहा दिनांक १३/०२/२०१५.

७) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन परीपत्रक क्र. साप्रवि/०४९/११/२०१५/मातंसं/३९ दिनांक २७/०६/२०१६.

८) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन परीपत्रक क्र. साप्रवि/०४९/२/२०१७ दिनांक १२/०७/२०१७.

९) मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान समन्वय केंद्र, पुणे जा. क्रमांक ०१२/२०२० दिनांक ११/०२/२०२१.

१०) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ असाधारण क्रमांक ६१ प्राधिकृत प्रकाशन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १४/११/२०१३.

११) महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ व २०१५ मधील नियम व उपनियम.

१२) सार्वजनीक बांधकाम विभाग मंत्रालय जावक क्रमांक-माअअ-२०२३/प्र.क्र.७७/सेवा-४ दिनांक २६/०४/२०२३.

महोदय, संदर्भिय क्रमांक १) अनुसार मा. राज्य माहिती आयुक्त यांनी सार्वजनीक बांधकाम विभागाची वेबसाईट ६० दिवसांत अद्ययावत करण्याचे निर्देश.

संदर्भिय क्रमांक २) अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय ह्यांचे वेबसाईट विहित कालमर्यादेत अद्यावत करण्याचे निर्देश व जबाबदारी निश्चितीचे स्मरणपत्र-१.

संदर्भिय क्रमांक ३) अनुसार पुन:श्च सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय यांचे वेबसाईट विहित कालमर्यादेत अद्ययावत करण्याचे निर्देश व जबाबदारी निश्चितीचे स्मरणपत्र-२.

संदर्भिय क्रमांक ४) अनुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचे संकेत स्थळावरील माहिती अद्ययावत ६० दिवसांत करण्याचे निर्देश तसेच कलम ४ (१) (ख) (११) अन्वये सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रक्कमांचा अहवाल तसेच परिपत्रक क्रमांक माअनि- २०१५/८८४/प्र.क्र.५५/इमा-३, दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ च्या अनुषंगाने संकेत स्थळावरील ठेवण्यात आलेली माहिती अद्ययावत ३० दिवसांत करण्याचे निर्देश.

संदर्भिय क्रमांक ५) अनुसार अपील क्रमांक केआर-३६४१/२०१४ दिनांक १५/०७/२०१५ व अपील क्रमांक १६०/२२/०१ नोंदणी क्रमांक ५४५७/१९ दिनांक ०८/०२/२०२२ रोजीच्या निर्देशित निर्णयांची अंमलबजावणी करण्यास एकूण १२ प्रादेशिक विभाग कार्यालये जबाबदार.

संदर्भिय क्रमांक ६) अनुसार राज्य माहिती आयोगाकडून पारीत होणारे निर्देश इत्यादींचे काटेकोरपणे पालन होण्याबाबत आदींचे अनुपालन विहीत कालावधीत करणे बंधनकारक व आवश्यक.

संदर्भिय क्रमांक ७) अनुसार शासनाच्या तसेच विभागाच्या आणि संलग्न कार्यालयांच्या वेबसाईटवरील

माहितीच्या अधिकारातील माहिती **कलम ४ (१) (ख)** मध्ये दर्शविलेल्या **१७ बाबी** तसेच लोकोपयोगी महत्वाच्या योजना आदी बाबी वर्षातून दोन वेळेस अद्ययावत ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या.

संदर्भिय क्रमांक ८) अनुसार शासन तसेच विभागांच्या वेबसाईट अद्ययावत ठेवण्याबाबत जबाबदारी संबंधित विभागांच्या सहसचिव/उपसचिव (आस्थापना) यांच्याकडे देण्यात आली हे अधोरेखीत होते.

संदर्भिय क्रमांक ९) अनुसार सार्वजनीक बांधकाम विभागाचे संकेतस्थळ www.mahapwd.com / www.mahapwd.gov.in येथील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) (ब) व ४ (१) (ख) ची माहिती सर्व संबंधित सा. बां. प्रादेशिक कार्यालये, सा. बां. मंडळ, सा.बा विभाग कार्यालये व उपविभाग कार्यालये युजरनेम व पासवर्ड वापरून माहिती अद्ययावत ठेवतात.

संदर्भिय क्रमांक १०) अनुसार शासकीय कर्मचारी वर्गाने आपले उचीत कर्तव्य साक्षेपाने व जबाबदारीने पार पाडणे अपेक्षित.

संदर्भिय क्रमांक ११) अनुसार शासकीय कामात नितांत सचोटीपणा आवश्यक.

संदर्भिय क्रमांक १२) अनुसार शासकीय कामात शासन परीपत्रके, शासन निर्णय यांच्या कार्यवाही बाबतीतील जबाबदारी विशद करण्यात आली आहे.

महोदय, माहितीचा अधिकार हा राज्यघटनेच्या अनुच्छेद १९ (१) (क) मध्ये ध्वनित केल्यानुसार घटनादत व नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचा एक विस्तारित भाग ज्या योगे प्रशासन पारदर्शी आणि उत्तरदायित्व करण्याच्या प्रयत्नात नागरिकांचा सहभाग.

राज्य माहिती आयोगाकडून द्वितीय अपिलावरील पारीत होणारे निर्णय कलम १९ (७) अन्वये बंधनकारक तसेच त्यांचे अनुपालन विहीत कालावधीत करणे सार्वजनिक प्राधिकरणांस बंधनकारक आहेत व या संदर्भात कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर संबंधित सक्षम प्राधिकरणाने तातडीने उचीत विभागीय कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

महोदय, सोबत सादर करीत असलेल्या दि. १९ जुलै २०२३ रोजीच्या संकेत स्थळांच्या फोटोवरून संकेत स्थळावरील माहिती ही अद्ययावत नसून दि.२५ ऑगस्ट, २०१५ ते ३० जून, २०२३ या कालावधीतील सर्वच संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांकडून अक्षम्य हेळसांड व जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याचे वर्तन घडले असून आज ही सार्वजनिक बांधकाम विभागाची वेबसाईट व संकेत स्थळावरील माहिती अद्ययावत नाही.

महोदय, वरील विस्तृत विश्लेषणा वरून हेच निदर्शनास येत आहे की, माहिती तंत्रज्ञान धोरणाचा सन २०१०-२०११ सालीच अवलंब केलेला महाराष्ट्र तसेच अंदाजे ४,४९,५२३ कोटी रूपयांचा महसूली जमा

असलेला महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प व अंदाजे १८,००० ते २५,००० कोटींपर्यंत वार्षिक खर्च करणारा व अव्वल आणि मानांकित स्थानावर असलेला सार्वजनिक बांधकाम विभाग आपल्याच विभागाच्या वेबसाईट व संकेत स्थळावरील माहिती अद्ययावत ठेवण्याबावत उदासीन का आहे हे एक अनाकलनीय गूढ व दुर्दैव असून सन २०२३ साली सुध्दा माहिती अधिकाराच्या माध्यमातून या साठीच सातत्यपूर्ण पाठपुरावा करावा लागत आहे ही महाराष्ट्र राज्यातील प्रशासनास खचितच भूषणावह बाब नाही.

मा.राज्य माहिती आयुक्त आपणांस नम्र विनंती आहे की, आपण वरील उल्लेखित सर्व बाबींवर गांभीर्यपूर्वक विचार करून सदर प्रकरणी सुनावणी जलद गतीने घेण्याची तजवीज करावी. तसेच सदर सुनावणीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव वा त्यांनीच निर्देशित केलेल्या विभागाच्या अत्यंत वरीष्ठ पदावरील अधिकाऱ्यांस उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावेत.

महोदय, आपण माझ्या विनंतीचा साकल्याने विचार कराल असा आशावाद मी व्यक्त करीत आहे.

आपला विनम्र ३९/६/23 संग्रामसिंह प्रभाकर महाडिक अर्जदार
सोबतः वरील निर्देशित कागदपत्रे व १९ जुलै, २०२३ रोजीचे वेवसाईट संकेतस्थळावरील वस्तुनिष्ठ माहितींचे ३ फोटो.

त्याप्रमाणे **कलम ४ (१) (ख)** मध्ये दर्शविलेल्या **१७** बाबी तसेच लोकोपयोगी महत्त्वपूर्ण योजना यासंदर्भात सर्व योजनांचा तपशील विशेषतः **४ (१) (ख)** (**११**) अन्वये प्रस्तावित खर्च, अर्थसंकल्प, संवितरीत केलेल्या रकमांचा अहवाल इत्यादी बाबी अद्ययावत स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे तसेच **माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी किशनचंद जैन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया WP (civil) 1990 of 2021** या प्रकरणात सर्वच प्राधिकरणांनी स्वयंप्रेरणेने माहिती उघड करण्याबाबत दिलेले निर्देश, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात प्रशासनाला दिलेल्या सक्त सूचना यांचेही अनुपालन होत नसल्याबाबत खेद व्यक्त केलेला आहे.

अपिलार्थींच्या म्हणण्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग आपल्याच विभागाच्या संकेतस्थळावर माहिती अद्ययावत ठेवण्याबाबत उदासीन का आहे, हे एक अनाकलनिय गुढ असून यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करावा लागणे हे प्रशासनास खचितच भूषणावह नसल्याचेही नमूद केलेले आहे. या संदर्भात विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मागणीतील गांभीर्य ओळखून वरिष्ठ स्तरावर याबाबत चर्चा करून मार्गदर्शन घेण्यात येईल असे अपिलार्थीना त्यांच्या आदेशात सूचित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थींनी उपस्थित केलेली बाब ही अतिशय महत्त्वाची असून या आधीच **मा.कोकण खंडपीठाने कलम १९ (८)** अन्वये निर्देश जारी केलेले असून सद्य:स्थितीत सर्वच खंडपीठांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने हाती घेण्यात आलेली विकास कामे, या संदर्भातील विविध योजना, त्यासाठी राबविण्यात आलेली प्रक्रिया, आवंठित करण्यात आलेला निधी, झालेला खर्च, कामाचा टप्पा, कामाचा दर्जा या संदर्भात विविध शासकीय प्राधिकरण तसेच माननीय मुख्यमंत्री स्तरावर देखील मोठ्या प्रमाणात तक्रारी येत

असतात. तसेच लोकप्रतिनिधींद्वारा देखील सार्वजनिक बांधकाम विभागासंदर्भात सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात असून अशा सर्व शंकांना योग्य उत्तर देण्यासाठी सर्व प्रकारची माहिती ही स्वयंप्रेरणेने (Proactive disclosure) उघड करणे आवश्यक असून प्रस्तुत प्रकरणी **कलम १९ (८) व २५ (५) अन्वये खालील निर्देश देण्यात येत आहेत:-**

कलम १९ (८) :- केंद्रीय माहिती आयोगास किंवा यथास्थिती राज्य माहिती आयोगास आपल्या निर्णय प्रक्रियेत पुढील अधिकार असतील.

(क) या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करणे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाय योजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे ज्यामध्ये पुढील गोष्टींचाही समावेश असेल:-

(एक) एखाद्या विशिष्ट स्वरूपात माहिती मिळण्याची विनंती केली असल्यास त्या स्वरूपात माहिती पुरवणे.

(दोन) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची किंवा यथास्थिती राज्य जन माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

(तीन) विवक्षित माहिती किंवा माहितीचे प्रवर्ग प्रसिद्ध करणे.

(चार) अभिलेख ठेवणे त्याची व्यवस्था ठेवणे व तो नष्ट करणे या संबंधातील त्याच्या पद्धतीत आवश्यक ते बदल करणे.

(पाच) त्याच्या अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकाराचे प्रशिक्षण देण्याच्या तरतुदीत वाढ करणे.

(सहा) कलम ४ च्या पोट कलम (१) च्या खंड (ख) चे अनुपालन करून आयोगाला आर्थिक अहवाल सादर करणे.

(ख) कोणत्याही नुकसानीबद्दल किंवा झालेल्या अन्या हानीबद्दल भरपाई देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे.

(ग) या अधिनियमामध्ये तरतूद केलेली कोणतीही शासकीय लादणे.

(घ) अर्ज फेटाळणे.

कलम २५ (५) : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २५ (५) अधिनियमान्वये सार्वजनिक प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासंबंधीची त्यांची कार्यपद्धती या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा आशयाची अनुरूप नाही, असे यथास्थिती केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग यांना दिसून आल्यास आयोगास अशी अनुरूपता आणण्यासाठी त्यांच्या मते ज्या उपायोजना करणे आवश्यक असेल त्या विनिर्दिष्ट करण्याची प्राधिकरणांना शिफारस करता येईल.

सार्वजनिक बांधकाम विभाग हे सार्वजनिक प्राधिकरण असल्याने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून **कलम ४ (१) (ख) (११)** अन्वये योजना आणि कामांबाबतची सर्व माहिती दर ३ महिन्यांनी अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच दिनांक १५.०७.२०१५ रोजी कोकण खंडपीठाने जारी केलेल्या निर्देशाप्रमाणे अद्ययावत माहिती संकेतस्थळावर प्रत्येक विभाग व उपविभागाकरिता स्वतंत्र **Thread** देऊन त्यामध्ये संबंधित विभागाद्वारे

हाती घेण्यात आलेली कामे, सुरू असलेली बांधकाम/ रस्ते/ विविध विकास प्रकल्प यांचा तपशील त्या संदर्भात निविदा प्रक्रिया राबविली असल्यास व ती अंतिम झाली असल्यास त्या संदर्भातील तपशील, मंजूर केलेली रक्कम, उपरोक्त कामास प्रशासकीय मंजुरी मिळाल्याचा तपशील, आर्थिक वर्षनिहाय झालेला खर्च, प्रस्तावित खर्च, शिल्लक रक्कम, प्रदान करण्यात आलेली देयके व प्रलंबित असलेली देयके, संबंधित प्राधिकरणाने झालेल्या विकास कामाचे अवलोकन केल्यानंतर सादर केलेला प्रगती अहवाल, संबंधित कामाच्या दर्जाबाबत प्राधिकरणाने दिलेले प्रमाणपत्र, काम पूर्ण झाले असल्यास त्यासंदर्भात देण्यात आलेले प्रमाणपत्र, अंतिम देयक प्रदान केल्याबाबतचा तपशील, संबंधित काम हे सदोष आढळल्यास कंत्राटदारावर करण्यात आलेली कार्यवाही (कारणे दाखवा नोटीस), इ.असे सदोष बांधकाम दुरुस्त केल्याबाबत प्राप्त अहवालाची प्रत इत्यादी बाबींचा समावेश असावा.

राज्य सरकार अधिकाअधिक माहिती ही स्वयंप्रेरणेने उघड करण्याबाबत आग्रही असून मा.मुख्यमंत्री महोदयांनी नुकतीच महाराष्ट्र शासनातील सर्व प्रशासकीय व्यवस्था पारदर्शक, तंत्र व नागरिक स्नेही **(Techno friendly and Citizen friendly)** असावी असे वारंवार अधोरेखित केले असून विद्यमान मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यासंदर्भात योग्य ते प्रशासकीय निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व विभाग व उपविभागीय अधिकाऱ्यांना प्रचलित पद्धतीनुसार देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

२. अपिल क्र.४४१७/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-

(राहुल भा.पांडे)

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई

दिनांक : ०१-०६-२०२६

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२. मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.